भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2024 ◑

CS 326691

TREASURY OFFICE NASIK
18 NOV 2024
STPHC ATO

NOTARY
M. R. DHORE
AREA DIST NASHIK
REGD No. 19520
Expiry Date 31/10/2028
GOVT. OF INDIA

FIVE RUPEES NOTARIAL

NOTARY
NOTED & REGISTERED
at Serial No. 4764
DATE 12/11/2024
This Document Contains
Total 05 Pages

जोडपत्र २

| | |
|---|---|
| मुद्रांक कशासाठी पाहिजे | Extra Amenities (Bank) |
| मु.वि.रजि.अनुक्रमांक 7500 | दिनांक 22/11/2024 पैकी |
| मुद्रांक घेणाऱ्याचे नाव | Bank of Baroda |
| मुद्रांक घेणाऱ्याचा पत्ता | Nashik Golf Club |
| हस्ते असल्यास त्या व्यक्तीचे नाव | Abhijeet Patil |
| दस्त नोंदणी करणार आहे का ? | |
| दुय्यम निबंधक कार्यालयाचे नाव | |
| दस्ताचा प्रकार अनुच्छेद क्रमांक | |
| दस्तातील दुसऱ्या पक्षकाराचे नाव | |
| मिळकतीचे वर्णन | |
| मोबदला रक्कम | |
| मुद्रांक घेणाऱ्याची स्वाक्षरी | मुद्रांक विक्रेता स्वाक्षरी<br>भगवान वसंतराव पाचोरे<br>स्टॅम्पवेंडर, नाशिक , मु.वि.प.क्रमांक १०८/२००२ |
| मुद्रांक ज्या कारणासाठी खरेदी केला त्याच कारणासाठी वापरणे बंधनकारक आहे | |

NOTARY
M. R. DHORE
AREA DIST. NASHIK
REGD. No 10520
Expiry Date 31/10/2028
GOVT. OF INDIA

## जादा सुख सुविधा करारनामा

आज दिनांक: १० माहे डिसेंबर इसवी सन २०२४ रोज बुधवार

ते दिवशी नाशिक मुक्कामी...

| | | |
|---|---|---|
| १. श्री. गोरख विनायक आरखडे<br>वय: ३२ वर्षे, धंदा: नोकरी<br>पॅन: BFZPA 9812 H<br>२. सौ. भारती गोरख आरखडे<br>वय: २९ वर्षे, धंदा: गृहिणी<br>पॅन: BXPPC 5942 J<br>रा: मु.पो. तळवाडे, ता. येवला, जि. नाशिक | } | लिहून घेणार |

यांसी...

| | | |
|---|---|---|
| श्री. रोहित शिवाजी खैरनार<br>वय: २७ वर्षे, धंदा: व्यापार<br>पॅन: EVLPK 0507 E<br>रा: गर्खेडे, नाशिक-४२३४०१ | } | लिहून देणार |

<u>कारणे जादा सुख सुविधा करारनामा लिहून देतो ऐसा जे की,</u>

१) मिळकतीचे वर्णन: तुकडी जिल्हा नाशिक पोट तुकडी तालुका नाशिक पैकी नाशिक महानगरपालिका हद्दीतील मौजे अंबड खुर्द गांवचे शिवारातील यांसी सर्व्हे/गट नं. २७५/अ यांसी क्षेत्र १८५६.७२ चौ.मी. यापैकी नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचे रस्ता रुंदीकरणासाठी वर्ग झालेले क्षेत्र ३८७.४३ चौ.मी. वजा जाता उर्वरीत क्षेत्र १४६९.२९ चौ.मी. यावर बांधण्यात आलेल्या ''अवध इलाईट'' विंग ए, या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारती मधील सहाव्या मजल्यावरील सदनिका/फ्लॅट नं. ६०२ (सहाशे दोन) यांसी चटई क्षेत्र ५५.३८ चौ.मी., बाल्कनी क्षेत्र ६.६९ चौ.मी. असे एकूण क्षेत्र ६२.०७ चौ.मी. यांसी चतु:सिमा मंजुर बिल्डींग प्लॅन प्रमाणे.

येणेप्रमाणे चतु:सिमेतील मिळकत त्यावरील जल, तरू, काष्ठपाषाण, निधिनिक्षेप, तदंगभुत वस्तुंसह, जाणे-येणेचे व वागवहिवाटीचे हक्कांसह इतर मिळकत धारकांबरोबर सामाईक सुविधा वापरांचे हक्कांसह दरोबस्त मिळकत.



२. वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही लिहून घेणार यांनी मे. अक्षर बिल्डर्स् भागीदारी संस्था तर्फे भागीदार श्री. कल्पेश दामजीभाई नरोडीया यांच्याकडुन ॲग्रीमेंट फॉर सेल (साठेखत करारनामा) अन्वये विकत घेतलेली असुन त्याबाबतचे ॲग्रीमेंट फॉर सेल (साठेखत करारनामा) मे. दुय्यम निबंधक साहेब, नाशिक यांच्या कार्यालयात नोंदविण्यात आलेले आहे. सदर ॲग्रीमेंट फॉर सेल (साठेखत करारनामा) अन्वये वर वर्णन केलेल्या मिळकतीत लिहून घेणार यांना अंतर्गत वेगळ्या सुख-सुविधा करावयाच्या होत्या व लिहून देणार हे सदर अंतर्गत सुख-सुविधांचे काम करतात याबाबत लिहून घेणार यांना माहिती मिळाली व त्यांनी लिहून देणार यांना आपण घेतलेल्या मिळकतीत बिल्डर्स् कडुन मिळालेल्या सुख-सुविधांच्या व्यतिरीक्त नविन सुख-सुविधा करावयाचे ठरले त्यासाठी सदरचा जादा सुख सुविधा करारनामा लिहून घेणार व लिहून देणार यांचे दरम्यान करावयाचे ठरले त्यासाठी सदरचा करारनामा लिहून देणार हे लिहून देत आहे व मे. नोटरी यांच्या समक्ष नोंदवुन देत आहे.

३. खालील प्रमाणे जादा सुख सुविधा लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना करुन द्यावयाच्या आहे.

| अ. क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | डिझायनर टाईल्स ७ फुट पर्यंत संडास-बाथरुम व किचन मध्ये | ५८,०००/- |
| २ | ग्रॅनाईट ॲन्ड किचन टॉप विंडो सिल | ५६,५००/- |
| ३ | अंतर्गत पी.ओ.पी. (हॉल) | ४६,९००/- |
| ४ | व्हिट्रीफाइड टाईल्स (नॅनो टेक्नो.) | ५०,९००/- |
| ५ | एल.पी.जी. गॅस पाईपलाईन | ४३,५००/- |
| ६ | फॉल सिलींग इन हॉल (डिझाईन+एल.ई.डी. मध्ये) | १६,७००/- |
| ७ | डिझायनर दरवाजा (बाहेरील) वुडन फ्रेममध्ये | ३३,२००/- |
| ८ | इलेक्ट्रीक फिटींग वायर पॉलिकॅब व स्विचेस ॲन्कर रोमा कंपनीचे | ६१,८००/- |
| ९ | भिंतींना ॲक्रेलिक रंग (एशिन पेंट) | ५६,५००/- |
| १० | स्टॅंडिंग बाल्कनींना एम.एस. सेफ्टी डोअर्स | १७,०००/- |
| ११ | युटिलीटी व पार्किंगमध्ये व्हिट्रीफाईड टाईल्स | ४०,०००/- |
| १२ | वुड रुप, फर्निचर व इतर फिक्चस् | १,६९,०००/- |
| | एकुण- | ६,५०,०००/- |

वर वर्णन केल्याप्रमाणे लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना त्यांच्या मिळकती मध्ये सुख-सुविधा करुन दयावयाच्या आहेत त्यासाठी लागणारे **एकुण खर्च रक्कम रुपये ६,५०,०००/- (अक्षरी रु. सहा लाख पन्नास हजार मात्र)** लिहुन घेणार हे कोणत्याही वित्तीय संस्थेकडुन कर्जप्रकरण मंजुर करून घेऊन लिहुन देणार यांचे नावे धनादेश/धनाकर्ष/पे-ऑर्डर/आर.टी.जी.एस. अथवा रोख स्वरुपात अन्वये अदा करतील, ही बाब उभयपक्षांना मान्य असुन त्याबाबत उभयपक्ष भविष्यात कोणताही वाद अथवा तक्रार उपस्थित करणार नाही असेही या दस्तान्वये लिहुन घेणार व लिहुन देणार यांना मान्य व कबुल केलेले आहे.

४. सदरील करारनामा हा लिहून घेणार व लिहून देणार यांच्या वालीवारसांवर बंधनकारक आहे व राहील.

५. सदर जादा सुख सुविधा करारनामा हा लिहून घेणार व लिहून देणार या उभयतांच्या संमतीने कोणाच्याही धाक दडपणांस बळी न पडता, पुर्ण शुध्दीत, त्यातील अटी व शर्ती समजावुन घेऊन लिहुन व नोंदवुन दिलेला आहे.

**हा जादा सुख सुविधा करारनामा**

**नाशिक**

**१. श्री. गोरख विनायक आरखडे** ................

**२. सौ. भारती गोरख आरखडे** ................

**(लिहून घेणार)**

**श्री. रोहित शिवाजी खैरनार** ................

**(लिहून देणार)**

**साक्षिदार:**

१. ................ २. ................

Parties are Identified by me

NOTARY M. R. DHORE AREA DIST. NASHIK REGD. NO. 10620 Expiry Date 31/10/2? GOVT. OF INDIA

ATTESTED

MUKUND R. DHORE
Advocate & Notary Govt. of India
District Court Compound, Nasik-2